ISBN : 978-93-24457-16-4

J.T.S.S.P. Mandal

# Shri Shiv Chhatrapati College, Junnar

NAAC Reaccredited 'A' Grade

## Department of Geography

Organized

**National Seminar**

In association with

Maharashtra Bhugolshastra Parishad, Pune

Sponsored By

Savitribai Phule Pune University, Pune

**On**

# An Overview on Recent Trends of Socio-Economic and Environmental Issues in India

**17 and 18 February 2017**



**Editor**

**Asst. Prof. A. J. Dushing**

**Convenor**

**Offg. Prin. Dr. C. R. Mandlik**

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | Infrastructure Of Rural Health Care Facilities In Nandurbar District Of Maharashtra | Mr. Sandip B. Garud<br>Prin. Dr. D.S. Suryawanshi | 125 |
| 28 | Analysis Of Regional Disparity In Maharashtra | Ashwin Chandrakant Kamble | 130 |
| 29 | Spatio Temporal Analysis Of Literacy Rate In Maharashtra | Dr Seema S Malewar<br>Sandip Masram | 136 |
| 30 | A Geographical Study Of Crop Diversification In Gadchrioli Districts (Ms) | Prof. Nagsen Namdeo Meshram | 140 |
| 31 | Regional Disparities In Government Health Care Services In The Nashik District, Maharashtra | Dr. S. D. Pagar | 144 |
| 32 | Agriculture Cropping Pattern: A Case Study Of Nagargaon Village, Shirur, Pune, Maharashtra | Dr. Nilesh Ashok Kale,<br>Prin. Dr. Aher A. B. | 151 |
| 33 | A Review Paper On Causes Of Deforestration: An Environmental Issue | Prof. Pawar Rajendra Sitaram | 154 |
| 34 | Noise Pollution | Prof. Sakhare V. U. | 159 |
| 35 | Socio-Economic Status Of Tribal Community In Khed Tahsil Of Pune District, Maharashtra. | Ranyewale Siddhart K.,<br>Suryawanshi Rajendra S.,<br>Wagh Sarika B.[3] | 160 |
| 36 | Population Resource: Demographic Dividend | Dr. Archana Kujur | 164 |
| 37 | Exploring Demographic Characteristics Of Himachal Pradesh: A District Level Gis Based Analysis | Dr. Daljit Kaur<br>Dr. Rajiv Sindhu<br>Mr. Sunil Agnihotri<br>Mr. Jadhav Gokul S. | 170 |
| | **Marathi** | | |
| 1 | पुणे जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर बदलाचा चिकित्सक अभ्यास | प्रा. दिलीप ज्ञानेशवर मुळूक | 175 |
| 2 | मेघालय राज्यामधील पर्यटन स्थळांचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास | प्रा. रविंद्र सुदाम भगत | 183 |
| 3 | हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण वस्तीची प्रारुपे : एक भौगोलिक विश्लेषन | प्रा. नागनाथ फड<br>प्रा. रमाकांत कसपटे | 188 |
| 4 | ग्रामीण विकास आणि पर्यटन | प्रा. डॉ. उजगारे डी. व्ही<br>प्रा. भाले पी. जे. | 192 |
| 5 | आळंदीतील तीर्थस्थळांचा भौगोलिक दृष्टीकोणातून अभ्यास | प्रा. दादासाहेब मारकड | 194 |
| 6 | जगतिकीकरण व भारतीय शेती | डॉ. तोळमारे एस. एस. | 198 |




Scanned by CamScanner

ISBN : 978-93-24457-16-4

# ग्रामीण विकास आणि पर्यटन

प्रा.डॉ.उजागरे.डी.व्ही. प्रा.माने पी.जे

भारत हा खेडयांचा देश असून देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ७५टक्के लोकसंख्या खेडयात राहते. शेती हा खेडयातील मुख्य व्यवसाय आहे. शेती व शेतीशी संलग्न व्यवसायांच्या विकासाद ग्रामीण विकास अवलंबून आहे. अगदी वेद काळापासून ते आजतागायत आपल्या अर्थव्यवस्थेतील खेडयातील महत्त्व वाढत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात १९५१ पासून भारताच्या नियोजित आर्थिक विकासाला प्रारंभ झाला. १९७० पासून ग्रामीण विकास हा कृषी विकासापेक्षा व्यापक आहे. याची शासनाला जाणीव झाली. त्या दृष्टीने शासनाने विविध विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. भारत सरकार विविध अंगांनी ग्रामीण क्षेत्राच्या विकासाचे प्रयत्न करीत आहे. त्यासाठी पंचवार्षिक योजनांमध्ये वाढती तरतूद केली जात आहे.

स्थूलमानाने विचार करता ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण क्षेत्राचा विकास होय. ग्रामीण लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे. त्यांना अधिक चांगल्या प्रकारे जगता यावे यांसाठी क्षमता वाढविण्याच्या हेतूने सध्यःस्थितीत संख्यात्मक व गुणात्मक वाढ घडवून आणणे. यामध्ये ग्रामीण भागात नवीन तंत्राचा प्रसार करणेउव्याख्यान देणेउविकासविषयक माहितीपट दाखवणेउ इत्यादींवर भर देऊन ग्रामीण लोकांच्या जीवनमानात बदल अपेक्षित आहेत. यावरून दैनंदिन जीवनात लोकांनी त्यांची जीवन जगण्याची व काम करण्याची पध्दत बदलणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण विकासाची व्याख्या**

१. डॉ.व्ही. के.आर.व्ही.राव

ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी तेथील नैसर्गिक व मानव संसाधनांचा पर्याप्त वापर म्हणजे विकास होय.

२. संयुक्त संघ

शासनाच्या व लोकांच्या संघटित प्रयत्नांऊारे सर्व समाजाच्या मतानुसार आर्थिकउ सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमाला हातभार लावायला शिकविणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय

३. शासनाच्या व लोकांच्या संघटित प्रयत्नांव्दारे सर्व समाजाच्या मतानुसार आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक परिस्थीत सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमाला हातभार लावायला शिकविणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.

आपल्या देशात प्राचीन काळापासून पर्यटन केले जाते. प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. पर्यटन ही संज्ञा प्रवास या शब्दाशी संबंधित आहे. मानवामध्ये प्रवासाची आवड प्रत्येक कालखंडात दिसून येते. प्राचीन काळी प्रवासाचा मुख्य उद्देश व्यापार हा होता. याशिवाय त्याकाळी प्राचीन ग्रंथ व ज्ञान संग्रहित करणे उ नवीन अनुभव घेणे उ तीर्थयात्रा करणे हा सुध्दा प्रवासाचा हेतू असे. तसेच ज्ञानसंपादन आणि विविध ठिकाणाचे अनुभव घेण्यासाठी व लोकजीवन समजून घेण्यासाठी त्यावेळी देशाटन केले जात नव्हते.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आजचे पर्यटन सुरू झाले. दोन्ही महायुध्दानंतर त्यास विशेष चालना मिळाली. पर्यटन हा एक व्यवसाय आहे. त्याचे स्वरूप अन्य व्यवसायपेक्षा वेगळे असून तो प्रामुख्याने सेवा व्यवसाय आहे. आल्हाददायक हवामान उ सृष्टीसौंदर्य उ सुगमता उ सुविधा उ निवासव्यवस्था व अन्य ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो. हे घटक ज्या ठिकाणी उपलब्ध आहेत. तेथे पर्यटन केंद्र व पर्यायाने पर्यटनाच विकास होतो.

**पर्यटनाची व्याख्या**

**प्रा.हुझिकेर व कॅप**

पर्यटन म्हणजे कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने अनिवासी व्यक्तींच्या सहवासातून आर्थिक उत्पादनाशिवाय असलेली भ्रमंती होय.

**हरमन श्युललर्ड**

पर्यटन म्हणजे असा एक आर्थिक कार्यक्रम की, ज्यात लोकांचा प्रत्यक्ष देशांतर्गत किंवा परदेशी प्रवेश वास्तव्य व हालचाल यांच्याशी संबंध आहे. यात वास्तव्याचे ठिकाण एखादा देश नगर किंवा प्रदेश या स्वरूपात असू शकते. पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. त्यापासून विविध प्रकारांचे आर्थिक फायदे देशाला मिळतात. परकीय चलन मिळते. मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. पर्यटन विकासात ऐतिहासिक स्थाने महत्त्वाची आहेत. ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो. हे घटक ज्या ठिकाणी उपलब्ध आहेत. तेथे पर्यटन केंद्र व पर्यायाने पर्यटनाचा विकास होतो. पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. त्यापासून विविध प्रकारचे आर्थिक फायदे देशाला मिळतात. परकीय चलन मिळते. मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. पर्यटन विकासात ऐतिहासिक स्थाने महत्त्वाची आहेत. ऐतिहासिक घटक उ घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्था असते. भारत हा एक ऐतिहासिक देश असून प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. तसेच महाराष्ट्रातील गडउकोट व किल्ले



Scanned by CamScanner

यांना प्रत्येक पर्यटक न चुकता भेट देतो. महाराष्ट्राची सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी समजले जाणारे पुणे शहर देशातील झपाट्याने वाढत जाणाऱ्या शहरांपैकी एक आहे. मुळा मुठेच्या संगमावर असलेल्या या नगराला दैदिप्यमान व ऐतिहासिक व साहित्यिक व विद्वत्तापूर्ण परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवरायांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या आपल्या राज्यात शिवरायांच्या महान कर्तृत्वाची साक्ष देणारे साडेतीनशेहून अधिक गड किल्ले आहेत. आपल्या राष्ट्राची शेती आणि ग्रामीण भाग खऱ्या अर्थाने संपन्न आहे. पण व्यवहारी जगापुढे त्यांची अवस्था आज बिकट झाली आहे. या शेतीला आणि ग्रामीण भागाला जर पुन्हा भरभराटीचे दिवस आणायचे असतील तर शेतीला पूरक व्यवसायांची जोड देण्याची गरज आहे. यादृष्टीने पर्यटन व्यवसाय चांगला पर्याय होऊ शकतो. अतिथी देवो भव ही आपली प्राचीन संकल्पना आहे. त्यातून आपण येणाऱ्या पर्यटकांचे नेहमीच स्वागत केले आहे. त्याला कल्पकतेची जोड दिली तर देशात पर्यटन व्यवसायाचा विकास जलद गतीने होऊ शकतो. पर्यटन उद्योग रोजगार उपलब्धतेचे साधन असून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणारा हा उद्योग आहे. सोयींनी उपलब्ध करून दिल्यास पर्यटकांचा ओघ भारताकडे वाढू शकेल. त्या अनुषगाने पर्यटन उद्योगाचा विकास होणे गरजेचे आहे.

संदर्भग्रंथसूची

१. मोहन सराफ, प्रा. ना. मा. आचार्य, ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार, १९९१
२. के. सागर, वाणिज्य व अर्थव्यवस्था घटक, वाणिज्य पब्लीकेशन्स.
३. प्रा. डॉ. संजय कप्तान, प्रा. जॉन्सन बोर्जेस, डायमंड पब्लीकेशन्स.
४. रामदास नागोजी बोलके, सागर बाबूराव वाळवेकर, भारतीय पर्यटन उदयोग, महाराष्ट्र उदयोजकता विकास केंद्र प्रकाशन, जानेवारी २०१४.
५. एस. व्ही. कुलकर्णी, ग्रामीण पर्यटन महाराष्ट्र उदयोजकता विकास केंद्र, जानेवारी २०१४.
६. अभिजीत सोनवणे, १ फेब्रवारी २०१४, सकाळ साप्ताहीक, सकाळ पेपर्स, पान नं ५१ व ५२.



Scanned by CamScanner